महाराष्ट्र शासन
(सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग)
**जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, औरंगाबाद**

सामाजिक न्याय भवन, इमारत A Wing, पहिला मजला, शिवाजी हायस्कूलच्या शेजारी, शासकिय दुध डेअरी परिसर, खोकडपुरा, औरंगाबाद पिन-४३१००५.
दुरध्वनी क्र. ०२४०-२४७३४९४, ईमेल-cvcaurangabad@gmail.com टोल फ्री नं. १८००२३३०४४४ वेबसाईट barti.maharashtra.gov.in

**क्र. जि.जा.प्र.प.स,औ /आस्था/** BANRF-2019/2020 **/२०२१-२२/** ३६० **दि.०९.०२.२०२२**

**प्रति,**
मा. महासंचालक,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था,
(बार्टी) पुणे.

**विषय:-** डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती BANRF-2019 व BANRF-2020 साठी गठीत केलेल्या निवड समितीने तयार केलेली निवडयादी सादर करणेबाबत.

**संदर्भ :** आपले पत्र क्रमांक ४८३, ४८४ व ४८५ दिनांक २७.०१.२०२२

**महोदय,**

उपरोक्त विषयाबाबत आपल्या संदर्भाधिन पत्राच्या अनुषंगाने सविनय सादर करण्यात येते की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती BANRF-2019 व BANRF-2020 या दोन वर्षांच्या अनुषंगाने योजनेचा लाभ घेण्यासाठी पात्र अर्जदारांमधुन विहीत संख्येनुसार अर्जदारांची निवड करण्यासाठी माझ्या अध्यक्षतेखाली तीन सदस्यीय निवड समिती गठीत करण्यात आली. सदर समितीमध्ये माझ्यासह डॉ. प्रताप कलावंत, उपकुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद व श्री. प्रदिप मुरलीधर भोगले, संशोधन अधिकारी, जिल्हा जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती, जालना यांचा समावेश आहे.

सदर निवड समितीने दिनांक ३१.०१.२०२२ व दिनांक ०३.०२.२०२२ ते ०९.०२.२०२२ या कालावधीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे व जिल्हा जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती, औरंगाबाद या कार्यालयात सलगपणे बैठका घेतल्या. सदर बैठकांमध्ये योजनेच्या अंमलबजावणीबाबत विहित केलेल्या मार्गदर्शक सुचना, योजनेचे निकष व निवडीची प्रचलित कार्यपध्दती इत्यादींचा समितीने बारकाईने अभ्यास करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती BANRF-2019 व BANRF-2020 या दोन्ही वर्षातील पात्र विद्यार्थ्यांमधुन विहीत संख्येनुसार प्रत्येकी २०० याप्रमाणे एकुण ४०० विद्यार्थ्यांची निवडयादी व त्या अनुषंगाने विद्याशाखानिहाय प्रतिक्षायादी तयार केली आहे.

सदर अनुषंगाने निवड समितीच्या बैठकांचे इतिवृत, विद्यार्थ्यांची विद्याशाखानिहाय व प्रवर्गनिहाय निवडयादी व प्रतिक्षायादी यासोबत सविनय सादर करण्यात येत आहे.

आपला विश्वासु
09/02/2022
(एस.आर.दाणे)
उपायुक्त तथा सदस्य,
जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती,
औरंगाबाद

सोबत - वरीलप्रमाणे
समितीच्या मान्यतेने